**महाराष्ट्र शासन**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला.
अशोक वाटीकेजवळ, कलेक्टर ऑफीस रोड, अकोला - ४४४ ००१
दुरध्वनी क्र.०७२४-२४३७०७८,२४३१९६० फॅक्स क्र.२४३७०७८

जा.क्र.शावैमवसरुअ/आस्था-३/ ३९६३ /२०२१ दिनांक २०/०५/२०२१

# जाहिरात

**बायोमेडीकल इंजिनियरची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्या करीता जाहीरात प्रसिध्द करणे बाबत.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे बायोमेडीकल इंजिनियरची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्या करीता जाहीरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन २४/०५/२०२१ ते ३१/०५/२०२१ पर्यत सायंकाळी ५ वाजेपर्यत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पात्र उमेदवाराकडुन आवश्यक त्या कागदपत्रासह विहित नमुन्यातील अर्ज अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

कंत्राटी स्वरुपात १२० दिवसांकरीता "बायोमेडीकल-इंजिनियर" पद भरण्या करीता खालील प्रमाणे अर्हता व वेतन नमुद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | वयोमर्यादा | शैक्षणीक अर्हता | ठोक वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | इंजिनियर बायोमेडीकल | खुला संवर्ग-३८ वय मागास संवर्ग-४३ | बायोमेडीकल इंजिनियर या शाखेची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी | रु.२५,०००/- |

**अटी व शर्ती :**

१) सदरील पद "कोविड १९ या रोगाचा प्रादुर्भाव असेपर्यत कंत्राटी स्वरुपाचे आहे."
२) सदरील पदावर कंत्राटी स्वरुपात कार्यरत उमेदवारास भविष्यात सदरील जागेवर कायमस्वरुपी नेमणूकिचा कोणताही हक्क राहणार नाही,
३) सदर नियुक्ती कंत्राटी पदावर तात्पुरती असेल व त्यांना नोटीस अथवा कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल व सेवा समाप्त झाल्यावर त्यांना कोणत्याही न्यायालयात नेमणुकीसंबंधीत दावा करण्याचा हक्क राहणार नाही अथवा शासनाकडे अर्ज करता येणार नाही,
४) त्यांची नियुक्ती चार महिन्याच्या कालावधी करीता राहील. सदर कालावधीत काम असमाधान कारक असल्यामुळे त्यांना पुर्व सुचना न देता त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.
५) वेळोवेळी अधिष्ठाता कार्यालयातुन आदेश निर्गमित होतील ते त्यांना बंधनकारक राहतील.
६) त्यांना अन्य शासकीय कर्मचा-याप्रमाणे सार्वजनीक सुटयांचा लाभ मिळेल.
७) त्यांना इतर शासकीय कर्मचा-याप्रमाणे म.ना.से. नि.१९८१ लागु नाही.त्यानुसार मिळणारी निवृत्ती विमा योजना /भनिनिनि अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही अथवा ज्या पदाचे काम केले आहे त्या पदावर कंत्राटीमध्ये नमुद केलेल्या मुदतीबाहेर कोणतेही अधिकार राहणार नाहीत व त्यांना कायम पणाचा हक्क किंवा दावा करता येणार नाही.
८) नेमणुकीच्या अटी मान्य असल्यास नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यापुर्वी त्यांनी विहित नमुन्यातील बंधपत्र रुपये १००/- चा स्टॅम्प पेपपरवर लिहुन देणे बंधनकारक राहील.
९) त्यांची सेवा कोणेतेही कारण न देता मुदतीपुर्वी समाप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. तसेच जर त्यांनी कंत्राटी काळात सेवा मुक्त व्हायचे असेल तर एक महिण्याची पुर्वी नोटीस किंवा एक महिण्याचे वेतन भरुन त्यांना कार्यमुक्त करण्यात येईल.
१०)त्यांचा उपरोक्त कंत्राटी कालावधी समाप्त होताच त्यांची कंत्राटी नेमणुक आपोआप संपुष्टात येईल.
११)उच्च शैक्षणीक अर्हता धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात

Scanned by CamScanner

येईल.

१२)वरील पदाच्या उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे व मराठी लिहिता वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

१३)अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवाराची मुलाखत घेण्यात येईल.

१४)उमेदवाराने चुकीची माहिती / कागदपत्रे दिल्यास उमेदवारी रद्द बाबत करण्यात येईल.

१५)उमेदवाराने अर्ज ए-४ आकाराच्या को-या कागदावर करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असाव्यात.

**अप) उमेदवाराची सर्वसाधारण माहिती :**

२) अर्ज केलेल्या पदाचे नांव २) ठळक अक्षरात स्वतःचे नांव, ३) अर्जदाराचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक अनिवार्य, ४) कामाचा अनुभव, - काम केलेली संस्था, धारण केलेले पद, कालावधी, पदाची जबाबदारी व वेतन , ५) संगणकाचे (एमएससीआयटी) उत्तीर्ण प्रमाणपत्र असणे आवश्यक

**ब) आवश्यक कागदपत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रति व मुळ कागदपत्रे :**

१) शैक्षणीक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/ जन्मतारखेचा दाखला, अनुभवाचे प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे फोटो (दोन)

२) अर्ज स्विकारन्याची तारीख २८/०५/२०२१ ते ३१/०५/२०२१ अधिष्ठाता, शा.वै. म. व स.रु. अकोला येथील कार्यालयातील आवक जावक विभागात सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

३)मुलाखतीची तारीख ०२/०६/२०२१ वेळ सकाळी ११.०० वाजता असुन उमेदवाराने अधिष्ठाता यांचे कक्षात मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने हजर राहावे .त्यासाठी वेगळे मुलाखत पत्रे पाठविली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

टिप : सदर जाहीरातीमध्ये कोणताही बदल किंवा रद्द करण्याची किंवा निवड यादी कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

(डॉ. मिनाक्षी गजभिये)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वोपचार रुग्णालय, अकोला.

प्रति,
सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला,
प्रत माहितीस्तव सादर : मा.संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.

Scanned by CamScanner